
# उदासीन आखाडा स्थापनेपूर्वी भगवान श्रीचंदजींची टाकळीत समर्थांशी भेट

कुंभ पर्व 2015
काउंटडाऊन 50

**नाशिकला आध्यात्मिक आणि धार्मिक भूमीचा दर्जा मिळवून देण्यात कुंभमेळ्याइतकाच इथे राहून गेलेल्या महान विभूतींचा परिसस्पर्शही कारणीभूत आहे. सतराव्या शतकाच्या उत्तरार्धात नाशिकच्या टाकळी क्षेत्री वास्तव्य केलेल्या समर्थ रामदास स्वामींचा पदस्पर्शदेखील नाशिकच्या धार्मिक उत्थापनाच्या समृध्दीत भर घालणारा होता. त्याच काळात उदासीन आखाड्याचे संस्थापक मानले जाणारे गुरू श्रीचंद यांनी टाकळीच्या मठात जाऊन समर्थ रामदास स्वामींशी भेट घेतल्याचे दाखले ऐतिहासिक कागदपत्रांमध्ये आढळतात.**



समर्थ रामदास स्वामींचे वास्तव्य नाशकात अवघे बारा वर्षे होते. त्या काळात त्यांनी गायत्री मंत्राचे पुरश्चरण करतानाच सामान्य जनतेत मिसळून त्यांची सुख-दुःखे जाणून घेतली. त्याच काळात नाशिक - त्र्यंबक तीर्थक्षेत्री आलेल्या तत्कालीन साधु, ऋषी-मुनींशीही त्यांचा संवाद घडून आल्याचे उल्लेख समर्थ शिष्यांनी लिहिलेल्या समर्थचरित्रात आढळून येतात.

## जन्मकाळ आणि भेटकाळातही सुसंगती

समर्थ रामदास स्वामींचा जन्म १६०८ सालचा असल्याचे दाखले आहेत. ते वयाच्या बाराव्या वर्षापासून पुढील बारा वर्षे नाशकात होते. तर उदासीन आखाड्याचे आचार्य श्री चंद्रदेवजी महाराज यांचा जन्मकाळ १५९४ सालचा सांगितला जातो. तेदेखील बालपणीच भारतभ्रमंतीवर निघाल्याचे उल्लेख आढळतात. त्यामुळे नाशकातील टाकळीच्या मठात दोन्ही महान विभूतींची भेट झाल्याचे ऐतिहासिक उल्लेख कालसुसंगतही असल्याचे कागदपत्रांवरून आढळते. अर्थात नक्की कोणत्या साली ही भेट झाली, त्याचे उल्लेख ऐतिहासिक कागदपत्रांमध्ये नसले तरी दोघांच्याही चरित्रात या भेटीचे उल्लेख आहेत.

## श्री गुरू नानकदेवजींचे सुपुत्र होते श्रीचंद्रदेवजी

लहरच्या शीख धर्माचे पहिले गुरू श्री गुरू नानकदेवजी आणि सुलक्षणादेवी यांच्या पोटी श्री चंद्रदेवजी महाराज यांचा जन्म झाला होता. सध्याच्या पाकिस्तानातील लाहोर जिल्ह्यातील खडगपूर तालुक्याच्या तलवंडी गावात जन्म झाल्यापासूनच या बालकात अद्भुत प्रतिभा असल्याचे त्यांच्या माता-पित्यांच्या ध्यानी आले. त्यामुळे गुरू नानकदेवजी यांनी त्यांना बालपणापासूनच त्यांचा स्वतःचा मार्ग निवडण्याची मुभा दिली होती.



त्र्यंबकेश्वरमधील श्री पंचायती बडा उदासीन आखाड्यातील भगवान श्री चंद्रदेव महाराज यांची मूर्ती.

## अद्भुत बालपणाचे दाखले

श्री चंद्रदेवजी हे बालपणापासून खेळण्याऐवजी ध्यानमुद्रेत बसण्याला प्राधान्य देत असत. जन्मजात प्रतिभेचा धनी असलेल्या या बालकाची अकराव्या वर्षी मौज करण्यात आली. त्यानंतर वयाच्या अवघ्या १४व्या वर्षी त्यांनी काशीच्या प्रख्यात विद्वानांना शास्त्रार्थात पराजित केल्याचे सांगितले जाते. त्यानंतर त्यांनी घरातून बाहेर पडून संपूर्ण देशभरात भ्रमण करून राष्ट्रवासीयांच्या समस्या आणि दुःखे जवळून जाणून घेतली.

## चीन, अफगाणमध्येही भ्रमंती

देशातील वैदिक धर्मात मोठ्या प्रमाणात अंतर्कलह असल्याचे दिसत असल्याचे त्यांनी बघितले. त्यामुळे त्या काळात भ्रमंती करताना त्यांनी जिथे जातील तेथील विद्वानांशी, साधु-संतांशी याबर काही उपाय शोधण्याचेही प्रयत्न केल्याचेही मानले जाते. देश भ्रमंती करताना प्रारंभी उत्तर भारतातून निघून पश्चिम भारत आणि तिथून दक्षिण भारतापर्यंत जाऊन आल्याचे सांगितले जाते. त्यानंतर ते फिरत फिरत उत्तर भारतातून थेट अफगाणिस्तान आणि चीनपर्यंतदेखील जाऊन आल्याचे उल्लेख त्यांच्या जीवनचरित्रात आढळतात.



श्री पंचायती बडा उदासीन आखाड्यातील भगवान श्री चंद्रदेव महाराज यांचे मंदिर.

## भेदाभेदाने दुभंगलेल्या समाजाला जोडण्याचे कार्य

संपूर्ण देशभरात भ्रमंती करताना हिंदू धर्माला भेदाभेद, अंतर्कलहाने ग्रासले असल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्यामुळे हा भेदभाव दूर करणाऱ्या वैदिक धर्माचा प्रचार-प्रसार करण्याचा प्रयास केला. विविध पंथांतील साधूंना एका विचाराने प्रेरित करीत त्यांना एका धाग्यात गुंफण्याचा प्रयत्नदेखील भगवान श्रीचंद्रदेवजींनी केल्याचे उल्लेख त्यांच्या चरित्रात आढळतात.

## दोन उदासीन आखाड्यांची निर्मिती

उदासीन म्हणजे उदास असाच प्रथमदर्शनी नावातून भास होतो. मात्र, उदासीन शब्दाची फोड 'उद' म्हणजे ब्रह्म आणि 'असीन' म्हणजे लीन अर्थात जो ब्रह्मतत्त्वात लीन झालेला आहे, असा उदासीन शब्दाचा मथितार्थ आहे. भगवान श्रीचंद्रजी आचार्य यांच्या प्रेरणेने अठराव्या शतकाच्या प्रारंभी श्री उदासीन पंचायती बडा आखाडा स्थापन करण्यात आला. मात्र, त्यातील काही तत्त्वांमध्ये मतभेद झाल्याने गत शतकाच्या प्रारंभी श्री उदासीन नया आखाडादेखील निर्माण करण्यात आला असून, या दोन्ही आखाड्यांना आखाडा परिषदेची मान्यता असून, ते दोन्ही त्र्यंबकेश्वरला आहेत.